खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरूनगर, ता. खेड, जि.पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२० – २१

## मराठी विभाग : वाचन प्रेरणा दिन


## दि. १५ ऑक्टोबर २०२०

# वाचनातून सौंदर्यदृष्टी विकसित करा : डॉ. राजेंद्र सांगळे

**राजगुरुनगर**
**जनप्रवास प्रतिनिधी**

ज्ञानग्रहणासाठी वाचन हे महत्त्वाचे साधन असून विद्यार्थ्यांनी समृद्ध वाचनातून जीवनाकडे पाहण्याची नवी सौंदर्यदृष्टी विकसित करावी. असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. राजेंद्र सांगळे यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित केलेल्या ऑनलाइन संवादसत्रात 'वाचनसंस्कृतीची बदलती रूपे आणि ई बुक व ऑडिओ बुक' या विषयावर ते बोलत होते.

> हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित केलेल्या ऑनलाइन संवादसत्रात चर्चा



या संवादसत्रात प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे आणि मराठी विषयाचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

डॉ. राजेंद्र सांगळे यांनी वाचनसंस्कृतीच्या आवश्यकतेवर भर देताना वाचनामुळे मनाची, बुद्धीची एकाग्रता वाढते असे सांगितले. कोरोना काळात वाचनाचे पारंपरिक स्रोत असलेली ग्रंथालये बंद असल्याने विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्रोत शोधून वाचनाची आवड अधिक समर्थपणे जोपासायला हवी. इंटरनेटवर किंडल, गुगल बुक, स्टोरी टेल अशा अनेक ॲपवर ई – बुक व ऑडिओ बुकच्या स्वरूपात दर्जेदार मराठी पुस्तकांचा खजिना उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यायला हवा. विद्यार्थ्यांनी वाचनासाठी वाचन असे न करता प्रत्यक्ष वाचताना आवश्यक त्या नोंदी करण्याची सवय अंगी बानवायला हवी, असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांनी वाचन वाढले की समज वाढते असे सांगून विद्यार्थ्यांनी सातत्याने वाचनाची आवड जोपासायला हवी असे सांगितले. वाचनाची अभिरूची वारसाहक्काने मिळणारी नसून विद्यार्थ्यांनी जे जे उत्तम ते टिपून घेण्याची गुणग्राहकता स्वत:मध्ये रुजवायला हवी असे त्यांनी आवाहन केले.

वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ऑनलाइन वाचन कट्ट्याचे आयोजन करण्यात आले. त्यात विद्यार्थ्यांनी त्यांना आवडलेल्या कवितांचे वाचन आणि सादरीकरण केले. याशिवाय मराठी विभागाने 'पत्रोत्सव' उपक्रमांतर्गत दि. १ ते १२ ऑक्टोबर दरम्यान ऑनलाइन पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन केले. त्यामध्ये प्रथम क्रमांक ऋतुजा सुभाष मांडेकर (विषय – करोना, तू हे काय केलंस...?), द्वितीय क्रमांक नवीन सुभाष डोंगरे (विषय– प्रिय, आई – बाबांस) आणि तृतीय क्रमांक प्रतीक्षा खराडे ( विषय – आईस..) या विद्यार्थ्यांचे आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

# ज्ञानग्रहणासाठी वाचन महत्त्वाचे साधन- डॉ. सांगळे

**राजगुरूनगर, दि. १८ (प्रतिनिधी)** - ज्ञानग्रहणासाठी वाचन हे महत्त्वाचे साधन असून विद्यार्थ्यांनी समृद्ध वाचनातून जीवनाकडे पाहण्याची नवी सौंदर्यदृष्टी विकसित करावी, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. राजेंद्र सांगळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित केलेल्या ऑनलाइन संवादसत्रात 'वाचनसंस्कृतीची बदलती रूपे आणि ई बुक व ऑडिओ बुक' या विषयावर ते बोलत होते. या संवादसत्रात प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे आणि मराठी विषयाचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

डॉ. राजेंद्र सांगळे म्हणाले, वाचनामुळे मनाची, बुद्धीची एकाग्रता वाढते. इंटरनेटवर किंडल, गुगल बुक, स्टोरी टेल अशा अनेक ॲपवर ई - बुक व ऑडिओ बुकच्या स्वरूपात दर्जेदार मराठी पुस्तकांचा खजिना उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यायला हवा. वाचन वाढले की समज वाढते. विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासायला हवी.

# ज्ञानग्रहणासाठी वाचन हे महत्त्वाचे साधन: डॉ. सांगळे

**रामचंद्र सोनवणे | राष्ट्र सह्याद्री**

**राजगुरुनगर :** ज्ञानग्रहणासाठी वाचन हे महत्त्वाचे साधन असून विद्यार्थ्यांनी समृद्ध वाचनातून जीवनाकडे पाहण्याची नवी सौंदर्यदृष्टी विकसित करावी असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. राजेंद्र सांगळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित केलेल्या ऑनलाइन संवादसत्रात 'वाचनसंस्कृतीची बदलती रूपे आणि ई बुक व ऑडिओ बुक' या विषयावर ते बोलत होते. या संवादसत्रात प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे आणि मराठी विषयाचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

डॉ. राजेंद्र सांगळे यांनी वाचनसंस्कृतीच्या आवश्यकतेवर भर देताना वाचनामुळे मनाची, बुद्धीची एकाग्रता वाढते असे सांगितले. करोना काळात वाचनाचे पारंपरिक स्त्रोत असलेली ग्रंथालय बंद असल्याने विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्त्रोत शोधून वाचनाची आवड अधिक समर्थपणे जोपासायला हवी. इंटरनेटवर किंडल, गुगल बुक, स्टोरी टेल अशा अनेक ॲपवर ई - बुक व ऑडिओ बुकच्या स्वरूपात दर्जेदार मराठी पुस्तकांचा खजिना उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यायला हवा. विद्यार्थ्यांनी वाचनासाठी वाचन असे न करता प्रत्यक्ष वाचताना आवश्यक त्या नोंदी करण्याची सवय अंगी बानवायला हवी, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांनी वाचन वाढले की समज वाढते असे सांगून विद्यार्थ्यांनी सातत्याने वाचनाची आवड जोपासायला हवी असे सांगितले. वाचनाची अभिरूची वारसाहक्काने मिळणारी नसून विद्यार्थ्यांनी जे जे उत्तम ते टिपून घेण्याची गुणग्राहकता स्वतः मध्ये रुजवायला हवी असे त्यांनी आवाहन केले.

वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ऑनलाइन वाचन कट्ट्याचे आयोजन करण्यात आले. त्यात विद्यार्थ्यांनी त्यांना आवडलेल्या कवितांचे वाचन आणि सादरीकरण केले. याशिवाय मराठी विभागाने 'पत्रोत्सव' उपक्रमांतर्गत दि. १ ते १२ ऑक्टोंबर दरम्यान ऑनलाइन पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन केले. त्यामध्ये प्रथम क्रमांक ऋतुजा सुभाष मांडेकर (विषय - करोना, तू हे काय केलंस...?), द्वितीय क्रमांक नवीन सुभाष डोंगरे (विषय– प्रिय, आई - बाबांस) आणि तृतीय क्रमांक प्रतीक्षा खराडे ( विषय - आईस..) यांचे आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

लोकमत

# मराठी विद्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा

**राजगुरुनगर :** राजगुरूनगर महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. राजेंद्र सांगळे यांचे ऑनलाइन व्याख्यान झाले. या संवादसत्रात प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी सहभाग घेतला.

यावेळी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ऑनलाइन वाचन कट्ट्याचे आयोजन करण्यात आले. त्यात विद्यार्थ्यांनी त्यांना आवडलेल्या कवितांचे वाचन आणि सादरीकरण केले. मराठी विभागाने ''पत्रोत्सव'' उपक्रमांतर्गत ऑनलाइन पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन केले. त्यामध्ये प्रथम क्रमांक - ऋतुजा सुभाष मांडेकर द्वितीय क्रमांक - नवीन सुभाष डोंगरे आणि तृतीय क्रमांक - प्रतीक्षा खराडे यांचे आले.

Hello Pune Gramin
Page No. 10 Oct 17, 2020
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख